सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००

फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२

Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in


क्रमांक: एमटीएस-०४२२/सीआर-०१/२०२२/तेरा दिनांक:- ३१ मार्च, २०२२

**प्रसिध्दीपत्रक**

**विषय :- महाराष्ट्र राजपत्रित तांत्रिक सेवा, संयुक्त पूर्व परीक्षा - २०२१**
**उमेदवारांच्या बैठकव्यवस्थेबाबत.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शनिवार, दिनांक ३० एप्रिल, २०२२ रोजी महाराष्ट्र राजपत्रित तांत्रिक सेवा, संयुक्त पूर्व परीक्षा २०२१ मुंबईसह महाराष्ट्रातील अमरावती, औरंगाबाद, नाशिक, नागपूर व पुणे अशा एकूण ६ जिल्हाकेंद्रावर आयोजित करण्यात आली आहे.

२. विषयांकित परीक्षेच्या जाहिरातीस अनुसरुन आयोगास अर्ज सादर करतांना उमेदवारांनी त्यांच्या पसंतीचे जिल्हा केंद्र निवडले असले तरी, पुणे जिल्हाकेंद्रावरील प्रवेशासाठी कमाल क्षमतेपेक्षा जास्त प्रमाणात उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. सदर बाब विचारात घेता प्रस्तुत परीक्षेचे आयोजन सुरळितपणे होण्यासाठी पुणे जिल्हा केंद्र निवडलेल्या उमेदवारांपैकी पुणे महसुली विभागाच्या बाहेरील जिल्हा/शहरांमधील कायमस्वरुपी रहिवासाचा पत्ता नमूद असलेल्या उमेदवारांना त्यांच्या महसुली विभागांच्या मुख्यालयाच्या ठिकाणी म्हणजेच अमरावती, मुंबई, नाशिक व नागपूर जिल्हा केंद्रावर प्रवेश देण्यात येत आहे.

३. वरील व्यवस्थेप्रमाणे प्रवेश देण्यात आलेले जिल्हा केंद्र बदलण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव, कोणत्याही सबबीखाली मान्य करता येणार नाही.

ठिकाण: मुंबई

सह सचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग